# पोलीस पाटील : ज्ञानोबा (माऊली) मुंडे बहुआयामी व्यक्तिमत्व



## पांगरीच्या मातीतून उगवलेला कर्तृत्वाचा दीप : पोलीस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांना राज्यपालांचा मानाचा पुरस्कार ; 1 मे रोजी पालकमंत्री यांच्या हस्ते होणार वितरण

परळी वैजनाथ तालुक्यातील पांगरी (गोपीनाथ गड) या गावासाठी अभिमानाचा क्षण अवतरला आहे. गावचे पोलीस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांची सन 2025-26 या वर्षासाठी 'पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कारासाठी' निवड जाहीर झाली आहे. महाराष्ट्र शासन आणि राज्यपाल यांच्या वतीने दिला जाणारा हा अत्यंत प्रतिष्ठेचा सन्मान असून गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, पोलीस प्रशासनाला वेळोवेळी दिलेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल आणि समाजहितासाठी केलेल्या कार्यासाठी हा पुरस्कार प्रदान केला जातो. त्यामुळे हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून संपूर्ण परळी तालुक्याच्या आणि बीड जिल्ह्याच्या सामाजिक बांधिलकीचा गौरव आहे.

पांगरीच्या मातीतून उगवलेला कर्तृत्वाचा दीप : पोलीस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांना राज्यपालांचा मानाचा पुरस्कार जाहिर झाला आहे. या पुरस्कारासाठीची निवड प्रक्रिया दिनांक 26 मार्च 2026 रोजी जिल्हाधिकारी तथा पोलीस पाटील पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष श्री. विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी तसेच समितीतील सर्व सदस्य उपस्थित होते. बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून या प्रस्तावासाठी विशेष पाठपुरावा करण्यात आला. पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि प्रभारी पोलीस उपाधीक्षक (मु.) उमाशंकर कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावाची सर्व प्रक्रिया पूर्ण करून तो समितीसमोर सादर करण्यात आला. शासनाच्या सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या प्रस्तावांमधून पांगरीचे पोलीस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांच्या एकमेव प्रस्तावास मंजुरी देऊन त्यांची अंतिम निवड करण्यात आली. या निर्णयामुळे संपूर्ण बीड पोलीस दलात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्काराचे' वितरण महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दिनांक 1 मे 2026 रोजी सकाळी 9 वाजता पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. राज्यपालांच्या वतीने बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते हा पुरस्कार ज्ञानोबा मुंडे यांना प्रदान करण्यात येणार आहे. या सन्मानामध्ये पालकमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र आणि रुपये 25,000/- (पंचवीस हजार रुपये) रोख रक्कम देण्यात येणार आहे. हा क्षण त्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च सन्मानाचा ठरणार असून त्यांच्या दीर्घ सेवेला मिळालेली ही योग्य दखल आहे.

ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांचा जन्म 20 जून 1968 रोजी एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या कुटुंबात सामाजिक कार्याची आणि पोलीस पाटील पदाची परंपरा होती. त्यांचे आजोबा कै. नरहारी अंबादास मुंडे आणि वडील कै. भगवान नरहारी मुंडे यांनीही हे पद निष्ठेने भूषवले होते. त्या परंपरेतूनच ज्ञानोबा मुंडे यांना समाजसेवेचे बाळकडू मिळाले. वारकरी संप्रदायाच्या संस्कारात वाढ झाल्यामुळे त्यांच्या विचारांत साधेपणा, प्रामाणिकपणा आणि सेवा भावना दृढ झाली. त्यांनी राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आणि सन 2001 पासून पांगरी गोपीनाथ गड या गावचे पोलीस पाटील म्हणून जबाबदारी स्वीकारली.

पोलिस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांनी हे पद अत्यंत कर्तव्यदक्षतेने आणि निष्ठेने सांभाळले आहे. गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सण-उत्सव, जयंती कार्यक्रम, निवडणुका यावेळी प्रशासनासोबत समन्वय राखून त्यांनी शांततेत आणि शिस्तीत कार्यक्रम पार पाडले. गावातील तंटे मिटविण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले आणि पांगरी गावाला तंटामुक्त करून प्रथम पारितोषिक मिळवून दिले. त्यामुळे गावात सामाजिक सलोखा आणि शांतता निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील एक अत्यंत उल्लेखनीय पैलू म्हणजे पांगरी गावातील दारूबंदी चळवळ. परळी ते बीड रोडवरील पांगरी तांडा आणि पांगरी कॅम्प परिसरात महिलांनी पुढाकार घेऊन दारूबंदीचा निर्णय घेतला. दारूमुळे निर्माण होणारे कौटुंबिक कलह, भांडणे आणि सामाजिक असंतोष यामुळे त्रस्त झालेल्या महिलांनी एकत्र येत अवैध दारुविक्रीविरोधात आवाज उठवला. या चळवळीत ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांनी महिलांना ठाम साथ दिली. महिलांनी स्वतः दारूचे अड्डे उध्वस्त करण्याचे धाडसी पाऊल उचलले आणि पोलिसांच्या मदतीने कारवाई केली. परळी ग्रामीण पोलिस आणि गावातील पोलीस पाटील यांच्या सहकार्याने दोन ठिकाणी कारवाई करण्यात आली. या उपक्रमामुळे गावात शांतता प्रस्थापित झाली आणि सामाजिक वातावरण सुधारले.


ज्ञानोबा मुंडे हे केवळ गावापुरते मर्यादित राहिले नाहीत, तर त्यांनी राज्यभरातील पोलीस पाटील यांचे नेतृत्व केले आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटनेचे राज्य समन्वयक म्हणून त्यांनी विविध संघटनांना एकत्र आणून शासन दरबारी पोलीस पाटील यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या वेळी त्यांनी सर्व संघटनांना एकत्रित आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. राज्यातील कुठेही पोलीस पाटलांवर अन्याय झाला तर ते स्वतः पुढाकार घेऊन अधिकाऱ्यांशी चर्चा करून न्याय मिळवून देण्याचे काम करत आले आहेत. त्यांनी पोलीस पाटील मानधन वाढीसाठी मोठा लढा दिला. पूर्वी केवळ 6,500 रुपये असलेले मानधन वाढवून 15,000 रुपये करण्यात आले. या निर्णयासाठी त्यांनी मंत्री, पालकमंत्री, आमदार यांना वेळोवेळी भेटून निवेदने दिली. तत्कालीन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांना भेटून पोलीस पाटील भरतीबाबत निवेदन दिले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अनेक पोलीस पाटील यांना न्याय मिळाला.

राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांशी त्यांचे स्नेहसंबंध आहेत. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे, मा. मंत्री पंकजाताई मुंडे, मा. आमदार धनंजय मुंडे, खासदार भागवतराव कराड, माजी आमदार गोविंदराव केंद्रे, माजी आमदार भगवानराव नागरगोजे यांच्याशी त्यांचे स्नेहाचे संबंध राहिले आहेत. धनंजय मुंडे यांनी विरोधी पक्षनेते असताना सभागृहात पोलीस पाटील प्रश्न उपस्थित करुन मानधन वाढीसाठी पाठपुरावा केला होता.

कोरोना काळात त्यांनी गाव कोरोना मुक्त ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आरोग्य शिबिरे आयोजित केली, प्रशासनास मदत केली आणि नागरिकांमध्ये जनजागृती केली. गावातील गुन्हेगारी कमी करण्यासाठी त्यांनी प्रभावी काम केले. सत्याची बाजू घेऊन काम करताना त्यांनी नातेवाईकांनाही वगळले नाही. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वासाचे नाते निर्माण झाले.

त्यांनी गावात मोफत आरोग्य शिबिरे आयोजित केली. गणेश विसर्जन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बैलपोळा मिरवणूक, कुटुंब कल्याण कार्यक्रम, महसूल प्रशासनाचे आपत्कालीन काम अशा अनेक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना विविध प्रमाणपत्रे आणि पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. ज्ञानोबा (माऊली) मुंडे यांचे व्यक्तिमत्त्व शांत, संयमी आणि ठाम आहे. त्यांचे परखड वक्तृत्व, उत्कृष्ट संवादकौशल्य आणि संघटन क्षमता प्रेरणादायी आहे. त्यांनी आयुष्यभर पोलीस पाटील यांना न्याय मिळावा या उद्दिष्टाने काम केले आहे. त्यांना मिळालेला 'राज्यपाल पुरस्कार' हा त्यांच्या दीर्घकालीन सेवेला मिळालेला सन्मान आहे. हा पुरस्कार ग्रामीण प्रशासनातील इतर कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. त्यांच्या कार्यामुळे पांगरी गावाचा विकास आणि सामाजिक प्रगती अधिक बळकट होईल. या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, "हा पुरस्कार माझ्यासाठीच नव्हे तर संपूर्ण गावासाठी आहे. भविष्यातही गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि पोलीस पाटील यांच्या प्रश्नांसाठी ज्ञानोबा (माऊली) मुंडे कटिबद्ध आहेत. त्यांचा हा प्रवास संघर्ष, निष्ठा आणि समाजसेवेचा आदर्श आहेत. पांगरीच्या मातीतून उगवलेले हे व्यक्तिमत्त्व आज राज्यस्तरावर चमकत आहे. हा सन्मान म्हणजे त्यांच्या कार्याचा गौरव तर आहेच, पण येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे.

# शिक्षणातील जीवनमूल्यांचा राष्ट्रसंतीय अन्वयार्थ



ज्ञानाच्या वाटेवर चालताना माणसाच्या हातात पुस्तक असणे जितके महत्त्वाचे,तितकेच त्याच्या अंत:करणात संस्कारांचे दीप प्रज्वलित असणे आवश्यक असते.कारण शिक्षण हे केवळ अक्षरओळखीचे साधन नसते;ते मनुष्याच्या अंतरंगाला परिष्कृत करणारी,विचारांना दिशा देणारी आणि जीवनमूल्यांचे अधिष्ठान देणारी एक सर्जनशील प्रक्रिया असते.ज्या शिक्षणातून केवळ बुद्धीची वाढ होते;पण हृदयाचा विकास होत नाही.ज्या शिक्षणातून कौशल्ये तर निर्माण होतात;पण करुणा,सहकार्य,विनय आणि सामाजिक बांधिलकी यांसारखी मूल्ये रुजत नाहीत. ते शिक्षण अपूर्ण राहते.अशावेळी भारतीय संतपरंपरेत तेज:पुंजाप्रमाणे उभे राहणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे शिक्षणविषयक विचार आपल्या काळासाठी दीपस्तंभ ठरतात.

ज्ञानेश्वरांच्या ज्ञानाला,तुकारामांच्या भक्तीला आणि समर्थांच्या कर्तृत्वाला आधुनिक सामाजिक जाणिवेची जोड देणारे महत्त्वपूर्ण संत म्हणजे अर्थातच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. त्यांचे कार्य म्हणजे भारतीय संत परंपरेतील एक तेजस्वी अध्यायच ...त्यांच्या विचारांत अध्यात्माची उंची आहे, समाजप्रबोधनाची व्यापकता आहे आणि राष्ट्रनिर्मितीची सृजनशील तळमळ आहे.त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू केवळ ईश्वरभक्ती नव्हता;तर माणसाला जागवणे,समाजाला घडवणे आणि राष्ट्राला उन्नत करणे हा होता. म्हणूनच त्यांची ' ग्रामगीता 'ही काळाच्या पटलावर एक अक्षर कलाकृती म्हणून ओळखली जाते.त्यातून त्यांनी ग्रामविकास,सामाजिक समता, श्रमप्रतिष्ठा,स्त्रीउन्नती आणि शिक्षण याविषयी मांडलेले विचार आजही तितकेच समकालीन आणि मार्गदर्शक ठरतात.विशेषतः शिक्षणाविषयीची त्यांची भूमिका ही केवळ शैक्षणिक तत्त्वज्ञान नसून ती जीवन घडविण्याची आणि राष्ट्र उभारण्याची व्यापक संकल्पना आहे.

माणूस घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट;पण हे उद्दिष्टच आजच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये कुठेतरी मागे पडताना दिसते.सध्याचे शिक्षण प्रामुख्याने तांत्रिक,स्पर्धात्मक व बाजारपेठेच्या प्रभावाखाली जात असताना प्रत्ययाला येते.अशावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शिक्षणविषयक विचार नव्याने वाचले जाणे, समजून घेतले जाणे आणि शिक्षणव्यवस्थेत रुजवले जाणे ही काळाची गरज आहे.

शिक्षणाने माणसाच्या अंगी नम्रता,विनयशीलता वाढीस लागली पाहिजे.एक सक्षम माणूस म्हणून जगत असताना अशा सुशिक्षित व्यक्तीने स्वतंत्र, निर्भय व निश्चयी जीवन जगले पाहिजे.अगदी शिक्षणाने माणसावर तसेच संस्कार करणे गरजेचे आहे.हा विचार मांडत असताना राष्ट्रसंत -

"विद्ये अंगी व्हावा विनय।
विद्या करी स्वतंत्र,निर्भय।
शिक्षणाने वाढावा निश्चय।
जीवन जय करावया॥"

असा आविष्कार करून माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी भूमिका मांडतात. परावलंबित्त्व,भित्रेपण ,संभ्रमित जीवन त्यांना अभिप्रेत नाही.अहंकारापेक्षा विनयशीलतेची पूजा माणसाने करावी.शिक्षणातून ते साध्य करता यावे असा स्पष्ट संदेश त्यांच्या ओव्यातून प्रकटतो.शिक्षण घेऊनही जर व्यक्ती दुर्बल,परावलंबी व आत्मविश्वासहीन बनत असेल तर ते शिक्षण कुचकामी ठरते.त्यापेक्षा शिक्षणाने जीवन समृद्ध,सुंदर आणि सक्षम व्हायला हवे.हा त्यांचा विचार अतिशय महत्त्वाचा वाटतो.या दृष्टीने -

"याचसाठी शिक्षण घेणे।
की जीवन जगता यावे सुंदरपणे।
दुबळेपण घेतले आंदणे।
शिक्षण त्यासी म्हणू नये॥"

ही रचना विशेष लक्षात घेण्यासारखी आहे.

आज विद्यार्थी पदव्यांच्या ओझ्याखाली दबलेले दिसतात.शिक्षण भरपूर घेऊनही जीवनकौशल्य,संवादकौशल्य,भावनिक स्थैर्य व संकटांना सामोरे जाण्याची ताकद याचा अभाव मोठ्या प्रमाणात त्यांच्यात दिसतो.राष्ट्रसंतांना असे शिक्षण अभिप्रेत नाही.त्यांचे शिक्षणविषयक विचार म्हणजे 'जीवनशिक्षण'या संकल्पनेचे मूर्त रुपच होय.केवळ उच्चशिक्षित समाज यापेक्षा कर्तृत्ववान,श्रमशील व बलवान समाजाची अपेक्षा ते व्यक्त करतात.ही भावना व्यक्त करताना -

"नुसते नको उच्च शिक्षण।
हे तो गेले मागील युगी लपोन।
आता व्हावा कष्टिक बलवान।
सुपुत्र भारताचा॥ "

असा आविष्कार ते करतात.खरंतर आजचे शिक्षण हे 'व्हाईट कॉलर'नोकरीकडे झुकलेले दिसते. त्यातून हाताला काम,कौशल्य,उद्योगशीलता , शेती,तंत्रज्ञान,उत्पादन क्षमता यांचा विचार फार दुय्यमत्त्वाने केलेला दिसतो.परिणामस्वरुप उच्चशिक्षित तरुण बेरोजगारीचं जीवन जगतात.परावलंबित्व वाढीस लागल्याचा प्रत्यय येतो.याउलट राष्ट्रसंतांचा विचार हा 'श्रमसंस्कारा'चा विचार आहे.शिक्षणातून मुलावर त्याची रुजवणूक झाली पाहिजे ही त्यांची अपेक्षा रास्तच वाटते. त्यांचा 'कष्टिक बलवान सुपुत्र भारताचा ' हा आदर्श विचार आजच्या 'आत्मनिर्भर भारताच्या ' संकल्पनेशी थेट जोडलेला दिसतो.या संकल्पनेत त्यांना केवळ जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा विद्यार्थी अभिप्रेत नाही तर 'लोकल टू ग्लोबल 'या आद्य संकल्पनेच्या दृष्टीने सक्षम विद्यार्थी अभिप्रेत आहे.आज आम्ही शिक्षण व्यवस्थेवर दृष्टीक्षेप टाकल्यास आजचा विद्यार्थी केवळ जागतिक स्पर्धेच्या पातळीवर उभा राहणारा दिसतो.त्यासाठीच त्याचे प्रयत्न चालू आहेत;पण स्थानिक प्रश्न लक्षात घेणार कोण? त्यात ग्रामविकास,जलव्यवस्थापन,पर्यावरण,शेती,लघुउद्योग या विषयाकडे दुर्लक्ष होताना दिसतं.वास्तविक समाज उपयोगी नागरिक घडवणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय असले पाहिजे.विद्यार्थ्यांनी गाव,समाज आणि राष्ट्र यांच्या गरजा ओळखून सदैव कार्यरत राहिले पाहिजे.शिक्षणातून ते संस्कार विद्यार्थ्यात रुजले पाहिजेत. म्हणूच -

"मुलांना शिकवाव्या नाना कला।
सापडले ध्येयनिष्ठादि सकला।
गावची सांभाळू शकेल आपुला।
ऐसे द्यावे शिक्षण ॥ "

असा विचार ते मांडतात.त्यातून ग्रामविकास व कौशल्याधिष्ठिता ही व्यवहार्यपूर्ण कौशल्य त्यांना अभिप्रेत असल्याची प्रचिती येते.

सध्याच्या काळात यशाच्या पाठीमागे लागणारा विद्यार्थी जीवनमूल्य विसरतो आहे.ही बाब सामाजिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून निकोप कधीच ठरु शकत नाही.शिक्षणातून स्पर्धेपेक्षा सहकार्याचा, स्वार्थापेक्षा समन्वयाचा आणि व्यक्तीकेंद्रिततेपेक्षा समूहभावनेचा संस्कार महत्त्वाचा असल्याची भावना मांडताना राष्ट्रसंत आपल्या रचनेतून -

"सहकार्याची प्रबलभावना।
हेची शिक्षणाचे मुख्य सूत्र जाणा।
सहकार्या वाचून शिक्षणा ।
महत्त्व नाही ॥ "

असा विचार व्यक्त करतात.अर्थातच हे शिक्षणाचे मुख्य सूत्र बनले पाहिजे ही त्यांची भावना आहे.

शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्याच्या प्रतिभेनुसार शिक्षण दिले पाहिजे.सर्वांसाठी एकच माप लावून चालणार नाही.त्यांच्या अभिरुचीनुसार शिक्षण द्यावे हे सांगताना -

"तो पुढे जात दिसे निष्णात
त्या विद्येचा घेऊ द्यावा अंत॥"

असा आपल्याला अंतर्मुख करायला लावणारा विचार मांडतात.आज पालक मुलांच्या अभिरुचीचा विचार न करता नको ते शिक्षण मुलावर लादत आहेत. नेमके समाज घटकाचे इथेच चुकत आहे.राष्ट्रसंतांच्या म्हणण्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या अभिरुचीनुसार शिक्षण दिले तर कोणी वैज्ञानिक,कोणी साहित्यिक,कोणी कलाकार, कोणी संशोधक म्हणून पुढे येतील. परिणामस्वरुप विद्यार्थ्यांमधील त्या त्या उपजत कलागुणांचा विकास करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडता येईल.त्यांनी कित्येक दशकापूर्वी मांडलेला हा विचार आजच्या 'नवीन शैक्षणिक धोरणा 'तील शिक्षण विचाराशी साधर्म्य साधणारा आहे.

सामाजिक परिवर्तनाची दिशा संत तुकडोजी महाराजांच्या शिक्षणविषयक विचारात दिसते.विशेषतः स्त्रीविषयक शिक्षण भूमिका मांडताना ते अत्यंत प्रगत अशी मांडतात.

"महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास।
करील ऐसे शिक्षण खास।
जरी दिले जाईल त्यास।
तरीच भावी जग पालटे ॥"

आणि पुढे -

"समाज विकास ज्यास आवडे
त्याने शिकवावे मुलींना धडे॥"

स्त्री शिक्षण म्हणजे समाजशिक्षण,संस्कारशिक्षण, आणि भविष्यनिर्मिती होय असा परिवर्तनाचा मूलाधार घेऊन स्त्रीशिक्षणविषयक विचार ते मांडतात. अजूनही ग्रामीण भागामध्ये स्त्री शिक्षणाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. शिक्षणाच्या बाबतीतील विषमता,मुलींचे अर्धवट शिक्षण राहणे,सामाजिक बंधने या सर्व समस्या स्त्रियांच्या संदर्भात उद्भवताना दिसतात. अशावेळी संत तुकडोजी महाराजांचे विचार निश्चितच दिशादर्शक आहेत.

प्रारब्धापेक्षा प्रयत्नवाद हा राष्ट्रसंतांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा विषय -

"म्हणून मी सांगतो प्रयत्न करा।
विचारशक्ती प्रयत्नात भरा।
शिका शिकवा प्रयत्न करा।
व्यापू द्या गावोगावी॥"

असे शिक्षणाचे क्रियाशील तत्त्वज्ञानच त्यांच्या रचनेतून अभिव्यक्त होताना दिसते.क्रियाशीलता याचे महत्त्व प्रतिपादन करतानाच शिक्षण हे स्वतःपुरते सीमित न ठेवता त्याचा प्रचार व प्रसार करावा.समाजातील अंधकार नाहीसा करुन ज्ञानाचा दीप उजळवावा असा सामाजिक बांधिलकीचा आशयही त्यांच्या विचारातून आविष्कृत होतो.शिक्षण म्हणजे अज्ञानाचा अंधार घालवणारी दिवाळी अशी भूमिका ते मांडतात -

"शिक्षण देऊनी केली दिवाळी ।
अज्ञानाची करुनी होळी।
तुकड्या म्हणे मन रंगलं।
माझं गावच मंदिर शोभलं॥"

अशी सुंदर कल्पना त्यांच्या रचनेतून अभिव्यक्त होताना दिसते.जिथे शिक्षणाचा प्रकाश आहे तिथे अज्ञानाची होळी होते; आणि जिथे ज्ञान,संस्कार, सहकार्य आणि मानवता आहे ते गाव मंदिरासारखे पवित्र बनते.असा व्यापक आशय राष्ट्रसंत ग्रामगीतेतून व्यक्त करतात.

आजच्या शिक्षण व्यवस्थेला राष्ट्रसंताच्या अशाच विचारांची गरज आहे. ज्यात पदवीपेक्षा प्रज्ञेचा;स्पर्धेपेक्षा सहकार्याचा; माहितीपेक्षा संस्काराचा आणि करिअरपेक्षा चरित्रनिर्मितीचा भाग जास्त अनुस्यूत आहे. ज्या शिक्षणातून मनुष्य घडतो, समाज उजळतो आणि राष्ट्र सशक्त होते.तेच खरे शिक्षण;आणि त्या शिक्षणाचा दीपस्तंभ म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवनमूल्यांनीयुक्त संपन्न विचार. . .या विचारांचा जागर घालणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. . !

**प्रा.डॉ.राजकुमार किशनराव यल्लावाड**
**कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वै.**

# साम–दाम–दंड–भेद : आधुनिक व्यवस्थापन तत्त्वांचे भारतीय मूळ

डॉ. भारत कऱ्हाड

आजच्या जागतिक आणि स्पर्धात्मक युगात व्यवस्थापनशास्त्राला अभूतपूर्व महत्त्व प्राप्त झाले आहे. उद्योग, शिक्षण, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये यश मिळवण्यासाठी नियोजन, नेतृत्व, प्रेरणा आणि नियंत्रण या घटकांची आवश्यकता अधोरेखित केली जाते. या संदर्भात पाश्चात्य विचारवंत जसे की हेन्री फेयोल, फ्रेडरिक टेलर आणि पीटर ड्रकर यांचे योगदान मोठे मानले जाते. त्यांनी व्यवस्थापनाला सुसंगत, शास्त्रीय आणि प्रणालीबद्ध स्वरुप दिले, हे निश्चितच महत्त्वाचे आहे. परंतु या आधुनिक व्यवस्थापन तत्त्वांचा सखोल विचार केला असता, त्यांच्या मुळाशी भारतीय परंपरेतील विचारांचे प्रतिबिंब दिसून येते. विशेषतः "साम–दाम–दंड–भेद" ही तत्त्वे व्यवस्थापनाच्या मूलभूत अंगांना स्पर्श करतात. भारतीय संस्कृतीत व्यवस्थापन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून, ती मानवी जीवनाशी निगडित अशी एक समग्र संकल्पना आहे. कौटिल्य यांच्या अर्थशास्त्रात मांडलेले "साम–दाम–दंड–भेद" हे तत्त्व केवळ राजकारणापुरते मर्यादित नसून, नेतृत्व, संवाद, निर्णयक्षमता आणि संघटन या सर्व क्षेत्रांना लागू पडणारे आहेत. या चार तत्त्वांमध्ये व्यवस्थापनाचा गाभा सामावलेला आहे. "साम" हे तत्त्व संवाद, समजावून सांगणे आणि सहकार्य निर्माण करणे यावर आधारित आहे. कोणत्याही संस्थेच्या यशात मानवी घटक सर्वात महत्त्वाचा असतो. व्यवस्थापक आणि कर्मचारी यांच्यातील विश्वास, संवाद आणि परस्पर समज ही प्रगतीची मूलभूत अट आहे. आजच्या व्यवस्थापनात नेतृत्व, संघभावना आणि समन्वय यांना दिलेले महत्त्व "साम" या तत्त्वाशी सुसंगत आहे. एक प्रभावी नेता हा केवळ आदेश देत नाही, तर तो लोकांना प्रेरित करतो, त्यांचे मत ऐकतो आणि त्यांना सोबत घेऊन पुढे जातो. त्यामुळे "साम" हे व्यवस्थापनातील मानवी मूल्यांचे प्रतीक आहे. "दाम" हे तत्त्व आर्थिक प्रोत्साहनाशी संबंधित आहे. आजच्या व्यवस्थापनात वेतन, बोनस, प्रोत्साहन योजना आणि इतर आर्थिक लाभ यांना विशेष महत्त्व दिले जाते. कर्मचारी जितका समाधानी, तितकी त्याची कार्यक्षमता अधिक, हा अनुभवावर आधारित नियम आहे. त्यामुळे योग्य मोबदला देणे ही केवळ आर्थिक बाब नसून, ती प्रेरणा देण्याची प्रभावी पद्धत आहे. आर्थिक प्रोत्साहनामुळे कर्मचारी संस्थेशी अधिक निष्ठावान राहतो आणि त्याची कामगिरी सुधारते. "दाम" हे तत्त्व व्यवस्थापनातील प्रेरणा आणि उत्पादकतेचे आधारस्तंभ आहे. "दंड" हे तत्त्व शिस्त, नियम आणि जबाबदारी यांचे प्रतीक आहे. "दंड" म्हणजे केवळ शिक्षा नव्हे, तर नियमबद्धता आणि नियंत्रण यांची एक सुसंगत प्रणाली होय. कोणतीही संस्था शिस्तीशिवाय चालू शकत नाही. योग्य नियम, स्पष्ट जबाबदाऱ्या आणि आवश्यक तेथे ठाम निर्णय यामुळे संस्थेमध्ये सुव्यवस्था निर्माण होते. शिस्त ही प्रगतीसाठी आवश्यक असते आणि "दंड" हे तत्त्व त्या शिस्तीचे रक्षण करते. आधुनिक व्यवस्थापनात नियंत्रण आणि जबाबदारी यांना दिलेले महत्त्व या तत्त्वाशी पूर्णपणे सुसंगत आहे. "भेद" हे तत्त्व व्यवस्थापनातील रणनीती, विश्लेषण आणि निर्णयक्षमतेचे प्रतीक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी केवळ मेहनत पुरेशी नसून, योग्य दिशा आणि रणनीती आवश्यक असते. बदलत्या परिस्थितीचा अभ्यास करून योग्य निर्णय घेणे हे व्यवस्थापकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. बाजारातील बदल, स्पर्धकांची भूमिका आणि उपलब्ध संधी यांचे विश्लेषण करून पुढील दिशा ठरवणे आवश्यक असते. "भेद" हे तत्त्व व्यवस्थापनातील बौद्धिक आणि विश्लेषणात्मक क्षमतेचे प्रतिनिधित्व करते. या चार तत्त्वांचा एकत्रित विचार केला, तर व्यवस्थापनाचे संपूर्ण स्वरुप स्पष्ट होते. "साम" लोकांना जोडते, "दाम" त्यांना प्रेरित करते, "दंड" शिस्त राखते आणि "भेद" योग्य दिशा दाखवते. या सर्व घटकांचा समन्वय केल्यास व्यवस्थापन अधिक परिणामकारक आणि संतुलित बनते. पाश्चात्य व्यवस्थापन तत्त्वे जरी सविस्तर आणि संरचित असली, तरी त्यांचा मूलभूत आशय या चार तत्त्वांमध्ये प्रतिबिंबित होतो. आजच्या काळात आपण पाश्चात्य व्यवस्थापन पद्धतींचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे, आणि ते आवश्यकही आहे. मात्र, त्याच वेळी आपल्या भारतीय परंपरेतील ज्ञानाचा विसर पडू नये. "साम–दाम–दंड–भेद" ही तत्त्वे केवळ इतिहासाचा भाग नसून, ती आजही तितकीच उपयुक्त आहेत. आधुनिक व्यवस्थापनाच्या संकल्पना आणि भारतीय तत्त्वज्ञान यांची सांगड घातल्यास अधिक मानवी, संतुलित आणि प्रभावी व्यवस्थापन प्रणाली निर्माण होऊ शकते. आज व्यवस्थापनशास्त्र सतत बदलत आहे. नवीन तंत्रज्ञान, नवीन पद्धती आणि नवीन आव्हाने यामुळे व्यवस्थापनाचे स्वरुप अधिक जटिल होत आहे. अशा परिस्थितीत "साम–दाम–दंड–भेद" ही तत्त्वे व्यवस्थापकांना योग्य दिशा देऊ शकतात. ही तत्त्वे व्यवस्थापनाला मानवी मूल्यांशी जोडतात आणि निर्णयप्रक्रियेला संतुलित बनवतात. अखेरीस, असे म्हणणे योग्य ठरेल की "साम–दाम–दंड–भेद" ही तत्त्वे आधुनिक व्यवस्थापनाच्या प्रवासात मार्गदर्शक दीपस्तंभ ठरू शकतात. ती केवळ प्राचीन विचार नसून, आजच्या काळातही तितकीच प्रभावी आणि उपयुक्त आहेत. त्यामुळे आधुनिक व्यवस्थापन समजून घेताना या भारतीय तत्त्वांचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज आहे.

डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

मी नाही. माझ्या माहितीनुसार काँग्रेस पक्ष कदाचित आपला उमेदवार देईल.अंबादास दानवे यांचं नाव जाहीर होताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शिंदे यांनी म्हटले की, 'राज्यसभा निवडणुकीवेळी महाविकास आघाडीने शरद पवार यांनी पाठिंबा दिला होता. त्याचवेळी आम्ही विधानसभेला शिवसेनेचा जो उमेदवार असेल त्याला पाठिंबा देण्याची घोषणा केली होती. उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषेदत असावेत, अशी आमची मागणी होती. मात्र आता अंबादास दानवेंना त्यांनी संधी दिली आहे, तर आमची काही हरकत नाही.'

-----------------------------------

सकाळी 8.00 वाजता असल्याने इतर कार्यालयाने सकाळी 7.15 वाजेपूर्वी ध्वजारोहण करणे किंवा मुख्य ध्वजारोहणानंतर 9.00 वाजेनंतर ध्वजारोहण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

-----------------------------------

समवेत आ. धनंजय मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयात जाऊन स्व. पंडित अण्णा मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जल्लोष केला. यावेळी सिरसाळा ग्रामपंचायत नवनिर्वाचित सरपंच शेख नसीब शेख रहीम, माजी सरपंच फिरोज पठाण, ग्रामपंचायत सदस्य शेख नय्युम, शेख रफिक, अक्रम पठाण, सलमान पठाण, माजी सरपंच इम्रान पठाण, उपसरपंच सुलतान पठाण, मोहम्मद इनामदार, गुड्डू पठाण, मुस्लिम संघाचे जिल्हाध्यक्ष शिराज देशमुख, सिरसाळा सेवा सहकारी सोसायटी चेअरमन नदीम भाई, जावेद पत्रकार, अशोक गलांडे, तंटामुक्त अध्यक्ष गाव समिती सिरसाळा अयोसोद्दीन इनामदार, विद्यार्थी आघाडी बीड जिल्हा अध्यक्ष शेख राजू, इरफान बॉस, रफिक बागवान आदी उपस्थित होते.त्याचबरोबर जळगव्हाण येथील नवनिर्वाचित सरपंच संदीप वसंतराव चव्हाण यांसह राजाभाऊ सपकाळ, सुभाष जाधव, अमोल जाधव, उद्धवराव जाधव, कैलास क्षीरसागर, प्रल्हाद पंडित, शिवाजी राठोड, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश चव्हाण, रामजी चव्हाण, लक्ष्मण राठोड, विश्वनाथ आडे, उद्धव सोळंके यांसह आदी उपस्थित होते.मरळवाडी चे मयत सरपंच बापू आंधळे यांच्या पत्नी व नवनिर्वाचित सरपंच श्रीमती दीपाली बापुराव आंधळे यांच्या सह उपसरपंच वाल्मीक आघाव, चेअरमन हनुमान आंधळे, त्र्यंबक फड, विष्णू आंधळे, बाळासाहेब फड, संतराम आंधळे, परमेश्वर फड, बापुराव फड, अश्रूबा आघाव, तुकाराम व्हावळे, शिवाजी फड यांसह पदाधिकारी आदींनी जगमित्र कार्यालयात उपस्थित राहून विजयाचा जल्लोष साजरा केला.

-----------------------------------

संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख या रिंगणात होत्या. तर त्यांच्याविरुद्ध स्वरुपानंद देशमुख उभे होते.पहिल्यापासूनची ही लढत रंजक आणि अटीतटीची झाली होती. अखेर या निवडणुकीत स्वरुपानंद देशमुख यांनी अश्विनी देशमुख यांचा अवघ्या 92 मतांनी पराभव केला. विशेष म्हणजे गेल्या निवडणुकीत संतोष देशमुख यांनी स्वरुपानंद देशमुख यांचा अवघ्या 9 मतांनी पराभव केला होता.यंदाच्या सरपंच पदाच्या निवडणुकीत संतोष देशमुखांची मुलगी वैभवी आणि मुलगा विराज देशमुखने आपल्या आईसाठी प्रचार केला. त्यावेळी गावकरी भावुक झाले अन् त्यांच्या डोळ्यातून अश्रू आल्याचं दिसून आलं. सरपंचपदाची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी अशी दिवंगत संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची अपेक्षा होती. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी पाच उमेदवारांपैकी संजिवनी देशमुख, पंजाब देशमुख आणि करुणा देशमुख या तीन उमेदवारांनीच आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. तर स्वरुपानंद देशमुख यांनी आपला अर्ज कायम ठेवल्यामुळे ही निवडणूक झाली होती.

-----------------------------------

उपाय म्हणून शहरात मोठा पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला होता. उल्लेखनीय म्हणजे मागील काही दिवसांपासून शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित आहे का? याबाबत स्थानिक पोलिसांनी आत्मचिंतन करावे असे जाणकारांचे मत आहे.तामसा शहर व परिसरातून गोवंशाची मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक होते. दि. 22 रोजी तामसा पोलीस ठाण्यात जमादार श्यामसुंदर नागरगोजे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल होऊन चार लाखाच्या वाहनासह सहा लाखाचे तीन गोवंश ताब्यात घेण्यात आले होते. ही घटना ताजी असतानाच रविवारी सायंकाळी एका वाहनातून गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याचा संशय गोरक्षकांना आला. त्यांनी तात्काळ पोलिसांना पाचारण करुन संशयित गाडी अडवून तपासणी केली. मात्र, तपासणीअंती गाडीत कोणत्याही प्रकारचा गोवंश मिळून आला नसल्याने ती सोडण्यात आली, परंतु यादरम्यान गोरक्षक आणि दुसऱ्या गटाच्या तरुणांमध्ये शाब्दिक बाचाबाची होऊन राडा झाला. पोलिसांनी मध्यस्थी करुन जाग्यावरच वाद मिटवल्यानंतर एका विशिष्ट समाजाचे तरुण मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यासमोर जमा झाले. त्यामुळे पोलीस ठाणे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी भोकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी दत्तात्रय हक्के यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून नांदेड येथील अतिरिक्त पोलीस फोर्ससह हदगाव, हिमायतनगर, मनाठा आणि भोकर येथून मोठी पोलीस कुमक दाखल झाली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी कायदेशीर भूमिका घेऊन दोन्ही बाजूंच्या प्रमुख व्यक्तींशी संवाद साधून शांततेचे आवाहन केले. अखेर, फिर्यादीने तक्रार देण्याचे टाळल्यामुळे निर्माण झालेला तणाव निवळला. खबरदारी म्हणून शहराच्या मुख्य चौकांमध्ये दोन तास पोलिसांचा पहारा होता. सध्या तामसा शहरातील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांनी केले

-----------------------------------

करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. टी. पी. मुंडे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्रा. मुंडे यांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत, "शिक्षण, संघटन आणि संघर्ष हा त्यांचा मूलमंत्र आजच्या पिढीसाठी अत्यंत मार्गदर्शक आहे. समाजात समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने त्यांच्या विचारांचा अवलंब करणे आवश्यक आहे," असे आवाहन केले.या प्रसंगी गावच्या सरपंच शिवशल्या त्रिंबक मुंडे, नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे, भगवान साकसमुद्रे , सुदाम शिंदे, मोकिंद तात्या नागरगोजे, विनायकराव नागरगोजे, तुकाराम दादा नागरगोजे,वाल्मीक नागरगोजे, काशिनाथ मुंडे,तानाजी व्हावळे, रामधन घुगे, भागवत नागरगोजे, भागवत नागरगोजे पैलवान, नवीन बापू, लक्ष्मण व्हावळे, राधाकिशन व्हावळे, विद्या राधाकिशन व्हावळे, मधुकर नागरगोजे, मनोहर व्हावळे टेलर, महादेव व्हावळे,अनिल व्हावळे , समस्त जयंती कमिटी आदीसह बौद्ध उपासक उपासिका तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक महिला पुरुष युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------

साहेब, मा. श्री किरण गित्ते IAS सचिव: सार्वजनिक बांधकाम ,आरोग्य, उद्योग व वाणिज्य विभाग त्रिपुरा सरकार, विवेकानंद सोसायटीच्या अध्यक्षा, सौ. उषाताई किरण गित्ते यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी या नवीन शाळेचा उद्घाटन समारंभास विद्यार्थी पालक उपस्थित राहावे असे आवाहन बी डब्ल्यू पी एस वंडरलँड शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

-----------------------------------

मुळव्याध, फिस्टुला व फिशर तज्ञ स्तनाच्या विविध आजारांमध्ये तज्ञ डॉ. रुक्मिणी इसककर या महिला डॉक्टरकडून तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत या मोफत आरोग्य शिबीरात मुळव्याध, फिस्टुला व फिशर तज्ञ स्तनाच्या विविध आजारां बाबत तपासणी करण्यात येणार आहे.दुर्बिन व एन्डोस्कोपी तज्ञ पाईल्स, फिस्टुला, फिशर पालोनिडल सायनस व गुद्दद्वाराचे विविध आजारांमध्ये तज्ञमुळव्याध (Piles),,भगंदर (Fistula),फिशर (Fissure),पायलोनायडल सायनस (Pilonidal Sinus)दिनांक व वेळगुरुवार दि. 30-04-2026 रोजी सकाळी 10 ते सांय. 04 वाजेपर्यंत पत्ता डुबे हॉस्पिटल, गणेशपार रोड, परळी वैजनाथ पुर्व नाव नोंदणीसाठी संपर्क : 9082396259 या वर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

-----------------------------------

दुपारी 2.30 वाजताच्या दरम्यान अचानक सिस्टीमचे बेल्टला मोठ्या प्रमाणात आग लागली. आग विझवण्यासाठी प्रथमतः कारखान्याचे फायर फायटिंग सिस्टीम व अग्निशमन वाहनाने आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग आटोक्यात येत नसल्यामुळे नगर परिषद धारूर, वडवणी, माजलगाव येथील अग्निशमन वाहनांना पाचारण करण्यात आले. या अग्निशमन वाहनांबरोबरच कारखाना अधिकारी व कर्मचारी,कामगार यांच्या आटोकाट परिश्रमाने आग आटोक्यात आणण्यात आली.या आगीमध्ये अंदाजे 600 मेट्रिक टन बगॅस तसेच त्यावर बांधलेला बगॅस पुरवठा करणारे बेल्ट बी.सी.2, बी.सी.3, बी.सी.4, बी.सी.5, बी.सी.6 हे पूर्णतः जळून नष्ट झाले आहेत. त्यामुळे कारखान्याचे जवळपास रुपये 50.00 लाखाचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

-----------------------------------

करत निदर्शने आंदोलन करण्यात आले. आंदोलनाद्वारे काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला.दि. 17 एप्रिल 2026 रोजी लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावर मतदान झाले होते. यावेळी काँग्रेस पक्षाने विधेयकाच्या विरोधात मतदान केल्याचा आरोप करत, त्यामुळे महिला सक्षमीकरणाला धक्का बसल्याचे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले. महिला आरक्षण विधेयक नामंजूर होणे म्हणजे देशातील महिलांच्या हक्कांवर अन्याय असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन,संपर्क प्रमुख मनोज शिंदे तसेच जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.यावेळी तहसील कार्यालयासमोर घोषणाबाजी करत काँग्रेस पक्षाच्या भूमिकेविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. महिला आरक्षणास समर्थन देत महिलांना राजकारणात समान प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.आंदोलनात शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शिवसेनेचे शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके, धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे जिल्हाध्यक्ष सर्जेराव महाराज काशीद, उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा , शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईज धोंडीराम जाधव, संतोष देवकते विलास नेमाने सुरेश नवले अशोक चोरमले वैजनाथ चव्हाण, सलीम आत्तार राजेश चव्हाण, सुधीर कुलकर्णी, अँड महेश कुमार, आदी पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या तसेच शिवसैनिक सहभागी झाले होते. तहसील प्रशासनाला यासंदर्भातील निवेदनही देण्यात आले.

-----------------------------------

आधीच केलेले आहेत.धीरेंद्र शास्त्री यांच्या दुसऱ्या दाव्याबद्दल माहिती देताना श्याम मानव म्हणाले, "धीरेंद्र शास्त्री यांनी सांगितल्याप्रमाणे ते कोणाच्याही घरात जाऊन काहीही पाहून येऊ शकतात. त्या पद्धतीने त्यांनी पत्रकार संघाच्या शेजारच्या खोलीत 10 वस्तू ठेवल्या जातील, त्या त्यांनी ओळखून दाखवाव्यात. या दोन्ही प्रकारात जर धीरेंद्र शास्त्री यांनी 90 टक्के अचूक उत्तर दिल्यास त्यांनी दिव्यशक्तीचे आव्हान जिंकले आहे, असा त्याचा अर्थ होईल. मग आम्हीही मानू की त्यांच्या दिव्यशक्ती आहे

-----------------------------------

शिवसैनिकाला पुन्हा सभागृहात जाण्याची संधी देण्याचा निर्णय घेतला असल्याचे मला वाटते. निश्चितच मी उद्धव जींचा, पक्षाचा आणि शिवसेना प्रमुखांच्या विचाराने चालण्याचा आम्ही जो संकल्प केला मला असे वाटते त्याच विचाराचा हा विजय आहे. निष्ठा तर ठेवली पाहिजे. फळ म्हणायला गेलो तर ह्याच्या आधीही मी सभागृहात होतो. विरोधी पक्ष नेता होतो. निष्ठा तर ठेवली पाहिजे. परंतू सामान्य शिवसैनिकाला उद्धवजींनी त्यांची जागा दिली हे सगळ्यात महत्त्वाचे आहे.

## पान 4 वरुन

प्रो. डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते, डॉ. अनिलकुमार परदेशी, डॉ. दर्शना गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात त्रिंबकराव पाथ्रीकर यांनी विद्यार्थ्यांनी ज्ञान कौशल्य आणि आत्मविश्वास संपादन केला पाहिजे. पदवीनंतर त्यांनी शिक्षण, व्यापार उद्योग कृषी, लघुउद्योग, सूक्ष्म उद्योगात पदार्पण केले पाहिजे, असे विचार मांडले. यावेळी 500 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन डॉ. परशुराम बाचेवाड यांनी, तर उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. सुलक्षणा जाधव, डॉ. रणजीत मिस्त्री, डॉ. अविनाश धोत्रे, डॉ. विजय शिंदे, डॉ. भाऊसाहेब शिंदे व इतरांनी परिश्रम घेतले.

-----------------------------------

धारण केले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून अखेर थर्मल पॉवर स्टेशनच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. त्यांच्या तत्परतेमुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, पण तोपर्यंत मॉलमधील मोठ्या प्रमाणात माल जळून खाक झाला होता. या निष्क्रियतेवर संतप्त प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते तथा नगरसेवक नितीन बागवाले यांनी प्रशासनावर जोरदार हल्ला चढवला."आपत्कालीन सेवा नागरिकांच्या सुरक्षेसाठी असते, मात्र परळी नगर परिषदेची यंत्रणा पूर्णपणे कोलमडली आहे. 500 मीटर अंतरावर असताना अग्निशमन गाडी वेळेत पोहोचत नाही, ही अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी बाब आहे. हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या जीवाशी व मालमत्तेशी थेट खेळ आहे," अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाचा समाचार घेतला.बागवाले यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच शहरातील अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम व तत्पर करण्यासाठी ठोस उपाययोजना न झाल्यास परळीकरांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.दरम्यान, या घटनेमुळे शहरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, नगर परिषदेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

-----------------------------------

किंवा हातात पिशव्या असताना साधी छत्री पकडणे कठीण होते. त्यावर उपाय म्हणून एका सजग नागरिकाने थेट डोक्यावर टोपीसारखी फिट बसणारी छत्री वापरण्यास सुरवात केली आहे. यामुळे दोन्ही हात मोकळे राहून उन्हापासून पूर्ण संरक्षण मिळते. ही हटके छत्री सध्या बीडकरांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.उन्हाच्या तीव्रतेमुळे उष्माघाताची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा रुग्णालयासह अंबाजोगाईचे स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, परळी, गेवराई, केज, माजलगाव, लोखंडी, रायमोह, आष्टी, पाटोदा, नेकनूर, तालखेड, तेलगाव, चिंचवण आणि धारूर या सर्व उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांत स्वतंत्र उष्माघात कक्ष उभारण्यात आले आहेत. सुदैवाने अद्याप जिल्ह्यात उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नाही. आपत्ती व्यवस्थापन विभागाने नागरिकांना भरपूर पाणी पिण्याचे आणि दुपारी 12 ते 3 या वेळेत कष्टाची कामे टाळण्याचे आवाहन केले आहे.

-----------------------------------

संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे होते तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन भालचंद्र फड,माजी उपसरपंच रघुनाथ गित्ते,माजी चेअरमन तुकाराम गित्ते,नारायण गित्ते,संचालक नामदेव गित्ते हे होते,यावेळी सर्वसामान्य नागरिकाला हक्काने जगण्याचा अधिकार व देशातील वंचित घटकाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम बाबासाहेबांनी घटनेत दिलेल्या अधिकारामुळे झाल्याचे सिद्धेश्वर मुंडे यांनी प्रतिपादन केले. याबाबत सविस्तर वृत्त की विश्वभूषण,भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार,महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्त मौजे नंदागौळ येथे मंगळवारी 28 एप्रिल 2026 रोजी गावचे सरपंच सुंदरभाऊ गित्ते यांच्या हस्ते सकाळी 10.30 वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले,तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले,त्याचवेळी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरा विषयी अतिशय चांगले भाषण केले,यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी बाबासाहेबांनी भारतीय राज्य घटनेच्या माध्यमातून अनेक अधिकार सर्वसामान्य नागरिकांना दिलेले असून,उभ्या ह्यातीमध्ये देशातील सर्व जाती धर्मातील नागरिकांना न्याय देण्यासाठी खूप मोठे कार्य केले असून जो पर्यंत सूर्य –चंद्र आहे तो पर्यंत बाबासाहेबांचे विचार व कार्य अमर राहणार असून त्यांचे आपल्यावर अनंत उपकार असून देशातील वंचित घटकाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम बाबासाहेबांनी देशाला दिलेल्या घटनेमुळेच झाले असल्याचे म्हणाले,यावेळी उत्कृष्ट भाषण करणाऱ्या व स्पर्धेत सहभागी असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला,यावेळी गावाचे पोलीस पाटील शिवम भिसे,माजी सरपंच शंकरराव जगताप,वाल्मीक जगताप,ग्रामपंचायत सदस्य बाळू गित्ते,सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन शिवाजी गित्ते,संचालक मुक्ताराम गित्ते, ग्रामपंचायत सदस्या सौ.शांताबाई जगताप,सोसायटीचे संचालक उत्तम जगताप,गणेश गित्ते यांच्यासह नागरिक,महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते,या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत जगताप सर तर सूत्रसंचालन मार्केट कमिटीचे संचालक राजाभाऊ जगताप तर आभार उपसरपंच मिलिंद जगताप यांनी मानले जयंती उत्सव कमिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यानी अतिशय सुरेख नियोजन केले होते दरम्यान संध्याकाळी संपूर्ण गावातून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली,जय भीमच्या घोषणांनी अख्खा परिसर दणाणून गेला होता,गावकऱ्यांनी ठिकठिकाणी त्यांना अभिवादन केले,या मिरवणुकीत गावातील व परिसरातील हजारो नागरिक सहभागी झाले होते.

-----------------------------------

अध्यक्ष गौतम बनसोडे, प्रमुख वक्ते डी .एस. नरसिंगे, प्रा. डॉ. मकरंद जोगदंड प्रमुख उपस्थिती महेश गारठे सरपंच, दत्ता (काका) जाधव माजी जिल्हा परिषद सदस्य तथा ग्रामपंचायत उपसरपंच , बाळासाहेब देशमुख माजी उपसरपंच, राजकमल देशमुख युवा नेते, तंटामुक्ती अध्यक्ष मुख्तार शेख ,नितीन सरवदे, मिलिंद घाडगे अजय गंडले, मिलिंद ढगे अक्षय भुम्बे, महेश फड, प्रदीप वैद्य, पत्रकार विशाल जाधव, पत्रकार अशोक मस्के , परमेश्वर वैद्य पत्रकार उपस्थिती,मोलाचे मार्गदर्शन केले ,बाबासाहेबांनी सांगितले होते, "शिक्षित व्हा, संघटित व्हा आणि संघर्ष करा." प्रवक्ते यांनी तरुणांना उच्च शिक्षण घेण्याचे आणि केवळ पदवी न मिळवता ज्ञानार्जन करण्याचे आवाहन केले. मिरवणूक संपूर्ण गावातून चौका चौका मधून जय मल्हार प्रतिष्ठान यांच्यावतीने येथे डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भीमसैनिकांना थंडगार रसना वाटप करण्यात आला, मल्हार प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते, तसेच संग्राम कॅम्पुटर चे संदिप जाधव (सर) यांच्या वतीने मिरवणुकी मध्ये 350 पाणी बॉटल वाटप करण्यात आल्या. मुक्तार शेख यांच्या वतीने ही पाणी जार वाटप करण्यात आले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समारोप करते वेळेस अमोल गोडबोले (सर )यांनी बुद्ध वंदना घेतली पंचमंडळाच्या वतीने कार्यक्रम समारोप पोलीस उपनिरीक्षक असद शेख यांच्या हस्ते समारोप करण्यात आला.

-----------------------------------

वेल्फेअर फाउंडेशनच्या महाराष्ट्र कार्याध्यक्ष प्रिया रामेश्वर झांबरे यांनी प्रशासनाकडे निवेदन देऊन या मृत्यूची चौकशी करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्तांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत सीआयडी चौकशीचे आदेश दिले.आपल्या पत्रात त्यांनी घटनेच्या दिवशी तहसीलदार गिड्डे कोणाच्या संपर्कात होते, त्यांच्या हालचाली काय होत्या, तसेच अपघात घडण्यामागील सर्व बाबींची सखोल चौकशी करून स्वतंत्र अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अपघात नेमका कशामुळे झाला, यामागील सत्य उघड करण्यासाठी सीआयडीमार्फत तपास करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले आहेत.दरम्यान, या निर्णयामुळे गिड्डे यांच्या मृत्यूबाबत असलेल्या संशयाच्या छायेला उत्तर मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, निष्पक्ष चौकशीतून सत्य समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-----------------------------------

समस्यांवर प्रभावी नियंत्रणासाठी राज्यनिहाय कायद्यांऐवजी संपूर्ण देशभर लागू होईल असा एकसंध केंद्रीय कायदा करण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच, गोसंवर्धनासाठी स्वतंत्र 'केंद्रीय गोसेवा मंत्रालय' स्थापन करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन तहसीलदार कार्यालयामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्याकडे पाठवण्यात आले आहे. या मागण्यांमुळे गोसंवर्धनाच्या विषयाला राष्ट्रीय स्तरावर चालना मिळून भारतीय गोवंशाचे संरक्षण अधिक प्रभावीपणे होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

-----------------------------------

सोलापुर धुळे माहामार्ग रोडवर एक अनोळखी इसम वय-35 ते 40 वर्ष नाव गाव माहीत नाही. यास अज्ञात वाहनाने धडक देवुन त्यांचे अंगावरुन गाडी गेली असावी. त्यामुळे सदर अनोळखी इसमाच्या प्रेताचा चेंदामेंदा झालेला आहे. सदरील मृत इसमाची अद्याप ओळख पटलेली नसून, पोलिसांकडून ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. संबंधित मृत इसमाच्या अंगावर नाईट पॅन्ट असून त्यावर इंग्रजीत "Kill Will" असे अक्षर दिसत आहे. तसेच त्याने निळ्या रंगाचे कपडे परिधान केले असून पायात "Filer" कंपनीचे सँडल असल्याचे दिसून येत आहे. या घटनेप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. या बाबत काही माहिती असल्यास किंवा कोणी मिसींग किंवा कसे असेल बीड ग्रामीण पोलीस स्टेशन फोन क्र. 022442, 0222422 चौकशी अमंलदार मो. क्र.9822342082, प्रभारी अधिकारी मो.न. 7722035209 यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन बीड ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

-----------------------------------

यांना 545 मतदान झाले तर त्यांच्या प्रतिस्पर्धी श्रीमती शामल हातागळे यांना 420 मतदान पडले 125 मतानी राऊत विजयी झाल्या पण या विजयाचे खरे शिल्पकार किंगमेकर ठरले या गावचे लोकप्रिय उप - सरपंच श्री गोविंद बळीराम बादाडे हे नेहमी काडीवडगाव गावच्या नागरिकांच्या संपर्कात राहून लोकांची कामे करतात गावच्या ग्राउंन्ड लेवलला श्री गोविंद बादाडे यांच्या शब्दाला फार मोठी किंमत आहे प्रत्येक नागरिकाच्या सुःख / दुःखामध्ये सदैव तत्पर असतात गरिबांना सतत मदत करतात श्री गोविंद बादाडे यांच्या संसारातुन सोन्याचा धुर निघतो पण त्यांच्याकडे अहंकार गर्व अजिबात नाही त्यामुळेच ते गावामध्ये लोकप्रिय आहेत गावातील नागरीक त्यांच्याकडे भावी पंचायत समिती सदस्य तथा तालुक्याचे उप - सभापती म्हणून पाहाते या काडीवडगाव गावच्या निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये ग्रामपंचायतच्या विजयाचे खरे शिल्पकार तथा किंगमेकर ठरले श्रीमाण गोविंदजी बादाडे

-----------------------------------

विद्रोही सेनेचे अध्यक्ष भास्कर नाना शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये व्यंकटेश हॉल माजलगाव या ठिकाणी ही व्यापक बैठक पार पडली यावेळी राजेश भाऊ खंडागळे शेरकर सर रंजीत कसबे अनिल ढगे विलास लोंढे बळीराम कारके मोहन गायकवाड प्रदीप तांबे रमेश आलाट तसेच विविध पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी अनेक मान्यवरांचे या उपवर्गीकरण बैठकीस विविध समस्यांचे निराकरण करण्यात आले तसेच येणाऱ्या काळामध्ये आपणाला तीव्र स्वरुपाचा लढा उभा करावा लागेल त्यासाठी आपणाला तालुका जिल्हा या ठिकाणी विविध प्रकारे आंदोलने मोर्चे काढावे लागतील कारण की येणाऱ्या काळात आपल्या मुलांचे भविष्य घडवायच असेल तर आपणाला या उपवर्गीकरणाच्या लढ्यामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे लागेल असेही त्यांनी यावेळी आपल्या भाषणात म्हटलं आहे S C प्रवर्गातील काही जाती शिक्षणात मागे का ? वर्गीकरणाची आवश्यकता. भारतीय समाज रचनेत अनुसूचित जाती एस. सी. हा एक व्यापक आणि विविधतेने भरलेला प्रवर्ग आहे या प्रवर्गातील सर्व जातीची सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती एकसमान नाही हे वास्तव आज स्पष्टपणे दिसून येते काही जाती शिक्षण नोकरी आणि सामाजिक प्रगतीने पुढे गेल्या असताना इतर अनेक जाती आजही शिक्षणापासून कोसो दूर आहेत तसेच शासकीय क्षेत्रात त्यांचा आतापर्यंत कुठलाही सहभाग अत्यंत कमी आहे ही विषमता लक्षात घेऊन तिचे शास्त्रीय व अभ्यासपूर्ण विश्लेषण होणे गरजेचे आहे इतिहासातील सामाजिक बहिष्कार अस्पर्शिता आणि शिक्षणापासून दूर ठेवण्याच्या प्रथेमुळे अनेक जातींची शैक्षणिक वाटचालच सुरु होऊ शकली नाही आर्थिक दुर्बलता ग्रामीण व दुर्गम भागातील शैक्षणिक सुविधांचा अभाव पालकांचं अडाणी पण त्यामुळे अशिक्षित असणे आणि पहिल्या पिढीतील शिक्षण घेणारे विद्यार्थी ही कारणे अजूनही प्रभावी आहे परिणामी अनेक कुटुंबामध्ये शिक्षणाला दुय्यम स्थान मिळते आणि मुलांना लवकरच उपजीविकेसाठी कामाला लावून त्याचं वयाच्या अगोदरच लग्न करून त्याला ऊस तोडणीसाठी जावं लागतं हा एक मोठा महत्त्वाचा संदर्भ ठरतो 1871 मध्ये ब्रिटिशांनी लागू केलेल्या क्रिमिनल त्रिबेस ॲक्ट 1871 या कायद्यामुळे मातंग समाजासह काही समाजांना जन्मत गुन्हेगार अशी त्याची एक ओळख देण्यात आली. या कायद्यामुळे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेवर आघात झाला व त्याच्या हालचालीवर निर्बंध आली आणि समाजात अविश्वास निर्माण झाला या सर्वांचा थेट परिणाम शिक्षणावर झाला आणि अनेक पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिल्या नंतर 1952 मध्ये क्रिमिनल थ्रीबेज ॲक्ट रिपेल 1952 द्वारे हा कायदा रद्द करण्यात आला असला तरी त्याचे परिणाम पूर्णपणे नाहीसे झाले नाहीत आजही काही जाती शिक्षण नोकरी आणि सामाजिक सन्मानाच्या बाबतीत मागे असल्याचे दिसते यासंदर्भात एससी प्रवर्गातील अंतर्गत विषमता अधोरेखित होते काही जातींना आरक्षणाचा लाभ अधिक प्रमाणात मिळतो तर इतरांना जातींना तो अपेक्षित प्रमाणात मिळत नाही त्यामुळे शिक्षण आणि शासकीय नोकरीमुळे त्यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प राहते ही परिस्थिती बदलण्यासाठी एससी प्रवर्गातील वर्गीकरण ही एक आवश्यक आणि सकारात्मक पायरी ठरते वर्गीकरण म्हणजे काय वर्गीकरण म्हणजे कोणत्याही प्रकारचे विभाजन नाही तर न्याय संधीचे संतुलित वितरण होय यामुळे सर्वात वंचित घटकापर्यंत शिक्षण नोकरी आणि विकासाच्या संधी पोहोचवता येतात त्या मुळे या धोरणाचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे कारण ते सामाजिक न्यायाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरते यामुळे वर्गीकरण करताना समाजात एकोपा बंधुत्व आणि ऐक टिकून राहणे तितकेच महत्त्वाचे आहे यामध्ये कोणत्याही प्रकारची फूट किंवा मतभेद निर्माण न होता सर्व समाज घटकांनी एकत्र येऊन प्रगतीचा मार्ग स्वीकारला पाहिजे सामाजिक समतेचा खरा अर्थ म्हणजे सर्व घटकांचा समावेश आणि सन्मान छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य आणि न्याय न्यायधीष्ट राज्याची संकल्पना दिली लहुजी साळवे यांनी शोषितांसाठी संघर्ष व संघटनांचे महत्त्व पटवून दिले तसेच महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा आपणाला मार्ग दाखवला आहे राजश्री शाहू महाराज यांनी आरक्षणाच्या माध्यमातून वंचितांना कशी संधी दिली मुक्ता साळवे यांनी अस्पृश्य तेविरुद्ध आवाज उठविला साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याच्या माध्यमातून उपेक्षतांचे वास्तव्य मांडले आणि विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समता बंधुता आणि न्याय या मूल्यावर आधारित समाज रचना उभी करण्याचा मार्ग आपणाला दिला आहे या सर्व महामानवांचा सन्मान संदेश असा आहे की उपेक्षित समाधानचा विकास हा संदेश शिक्षण आणि सामाजिक न्याय यावर अवलंबून आहे आरक्षण व त्याचे योग्य वर्गीकरण हीच ती साधने आहेत जी वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणू शकतात येशी प्रवर्गातील सर्व जातींची स्थिती सन्मान नसून अनेक जाती अजूनही शिक्षण व शासकीय नोकऱ्यापासून दूर आहे ते आयुष्य मतेवर मात करण्यासाठी वर्गीकरण लक्ष केंद्रित धोरणे आणि सामाजिक एक या तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत

-----------------------------------

स्वखर्चातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गोरगरीब प्रवाशांना आता बाटलीबंद पाणी विकत घेण्याची गरज भासणार नाही. विशेषतः लांब पल्ल्याच्या प्रवासात पाण्याची सोय करणे कठीण असलेल्या नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे. याप्रसंगी बोलताना नितीन जुजगर म्हणाले की, "उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वसामान्यांचे होणारे हाल पाहून आपण ही सेवा प्रवाशांना शुद्ध आणि थंड पाणी मिळावे हाच यामागचा उद्देश असून, उन्हाळ्याच्या अखेरपर्यंत ही सेवा सुरु राहील," असे त्यांनी सांगितले.या पाणपोईमुळे प्रवासी, बसचालक, वाहक तसेच स्थानिक नागरिकांची मोठी सोय झाली असून, प्रवाशांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.जोशी साहेब (ATS) व अमोल दादा डाके यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुनील गोसावी, आकाश गिरी, अमोल शहाणे, बाळू शिंदे तसेच एसटी महामंडळ माजलगाव येथील कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बसस्थानकातील चालक, वाहक, प्रवासी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपस्थितांना पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

-----------------------------------

येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालय तसेच केज येथील शासकीय फळ रोप वाटिका येथेही सेवा दिली आहे.आपल्या सेवाकाळात त्यांनी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी बांधवांशी, आपुलकीचे व जिव्हाळ्याचे वर्तन ठेवले. शेतकऱ्यांच्या सेवेसाठी त्या नेहमी तत्पर राहिल्या. त्यांच्या कामातील निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यामुळे त्या सर्वांच्या मनात विशेष स्थान निर्माण करू शकल्या. त्यांच्या या उल्लेखनीय सेवेबद्दल तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या सेवापूर्ती समारंभास सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

-----------------------------------

किंवा टोपीचा वापर करा. मुलांना हलके, सैल आणि सुती कपडे घालावेत, जेणेकरून शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. मुलांना ताजे आणि पचायला हलके अन्न द्यावे. शिळे अन्न किंवा उघड्यावरील पदार्थ देणे टाळावे. जर मुलाला खूप ताप येत असेल, सुस्ती जाणवत असेल किंवा लघवीचे प्रमाण कमी झाले असेल, तर घरगुती उपचार न करता तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

लहान मुलांची प्रतिकारशक्ती कमी असल्याने उन्हाळ्यातील आजार त्यांना लवकर ग्रासतात. त्यामुळे पालकांनी घाबरून न जाता योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन डॉ. संभाजी नावडकर यांनी या निमित्ताने केले आहे.

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
4
गुरुवार दि. 30 एप्रिल 2026

# विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबर कौशल्य आत्मसात करावे : डॉ. प्रताप काळे

## देवगिरी महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ संपन्न





छत्रपती संभाजीनगर: देवगिरी महाविद्यालयात शुक्रवारी (दि. 24) पदवी वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रंसगी अप्पर विभागीय आयुक्त डॉ. प्रताप काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पदवीधर विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच कौशल्य आत्मसात करावे. पदवीनंतर अनेक क्षेत्र खुली आहेत. पारंपरिक करिअरच्या मागे न लागता कौशल्यपूर्ण क्षेत्रात भविष्य घडवावे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रताप काळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मशिप्रचे त्रिंबकराव पाथ्रीकर होते. याप्रसंगी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य

पान 3 वर

### परळी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचा बोजवारा!

# ‘रेझिंग’ मॉल जळून खाक; 500 मीटरवरूनही गाडी 40 मिनिटे उशिरा

## नगरसेवक नितीन बागवाले आक्रमक



चौकशी व कारवाईची मागणी, आंदोलनाचा इशारा

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरात बुधवारी (दि. 29) दुपारी लागलेल्या भीषण आगीत ‘रेझिंग’ या कपड्यांच्या मॉलचा अक्षरशः राखरांगोळी झाला. धक्कादायक बाब म्हणजे, घटनास्थळापासून अवघ्या 500 मीटर अंतरावर असलेल्या नगर परिषदेच्या अग्निशमन केंद्राची गाडी तब्बल 40 ते 50 मिनिटे उशिराने पोहोचली. या गंभीर हलगर्जीपणामुळे व्यापाऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकातील गजबजलेल्या ‘रेजिन लेडीज वेअर’ या दालनात अचानक आग लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळवले, मात्र प्रतिसादात झालेल्या विलंबामुळे आगीने रौद्ररूप

पान 3 वर

# पारा चढल्याने जनजीवन थंडावले अन् चटके वाढले; तापमान 43 अंश सेल्सिअसवर, रस्ते पडले ओस; उष्मांघातापासून बचावासाठी तयारी




बीड: मागच्या पंधरा दिवसांपासून सूर्याने जणू बीड जिल्ह्यावर आग ओकण्यास सुरवात केली आहे. मंगळवारी तापमानाचा पारा 44 अंशांकडे गेल्याची नोंद झाली. या वाढत्या तापमानामुळे बीडची बाजारपेठ थंडावली असून रस्ते भरदुपारी निर्मनुष्य होताना दिसत आहेत.

जिल्ह्यात उन्हाचा तडाखा इतका प्रचंड आहे की, सकाळी 10 पासूनच चटके जाणवू लागतात. दुपारी 12 ते 4 या वेळेत घराबाहेर पडणे जिकिरीचे झाले आहे. बीडमधील सर्वाधिक वर्दळीचा समजला जाणारा धुळे-सोलापूर महामार्ग दुपारच्या सत्रात पूर्णपणे ओस पडत आहे.

एखाद दुसरे वाहन किंवा लांब पल्ल्याची बस सोडली, तर महामार्गावर शुकशुकाट जाणवतो. नागरिक आपली सर्व महत्त्वाची कामे सकाळीच उरकून घेत आहेत. शेतकरीही मळणी आणि मशागतीची कामे सकाळी किंवा सायंकाळच्या सत्रातच करत आहेत. मात्र, या भीषण उन्हातही पोटाची खळगी भरण्यासाठी वीटभट्टी आणि बांधकाम कामगारांना डोक्यावर ऊन घेऊन काम करावे लागत आहे.उन्हापासून वाचण्यासाठी बीडकरांनी आता नवनवीन आणि हटके उपाय शोधले आहेत. शहरात सध्या एका हेड-माउंटेड छत्रीची मोठी चर्चा आहे. दुचाकी चालवताना

पान 3 वर

# देशातील वंचित घटकाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम बाबासाहेबांमुळेच झाले – सिद्धेश्वर मुंडे

## » सरपंच सुंदर गित्ते यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न !



सरपंच सुंदर गित्ते यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न !



परळी(प्रतिनिधी) परळी तालुक्यातील नंदागौळ येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्त 28 एप्रिल रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,सरपंच सुंदरभाऊ गित्ते यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले,या जयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक

पान 3 वर

# घाटनांदुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 जयंती उत्साहात साजरी



घाटनांदुर महेंद्र गोदाम अंबाजोगाई प्रतिनिधीअंबाजोगाई : तालुक्यातील घाटनांदुर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली समस्त बौद्ध पंचम मंडळ यांच्या वतीने हे नियोजन करण्यात आले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष महेंद्र गोदाम, उपाध्यक्ष अविनाश गोदाम व इतर सदस्य यांनी परिश्रम घेऊन, आदर्श भीम जयंती उत्सव समिती घाटनांदुर , माजलगाव लेझीम संघ आपल्या कलेचा प्रदर्शन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली व गावातील समस्त गावकरी मंडळी सुद्धा या जयंती मध्ये मोठ्या उत्साहाने सामील झाले ,कार्यक्रमाची सुरुवात तथागत चौक येथे असलेले पंचशील नगर ,आंबेडकर विहार येथे कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे

पान 3 वर

# तहसीलदार राकेश गिड्डे मृत्यू प्रकरणाची सीआयडी चौकशी



बीड : केज येथील दिवंगत तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती मृत्यूबाबत संशय व्यक्त होत असताना या प्रकरणाची सीआयडीमार्फत सखोल चौकशी करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत. यासंदर्भात त्यांनी बीडचे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना पत्र पाठवून आवश्यक ती कार्यवाही करण्यास सांगितले आहे.

काही दिवसांपूर्वी अंबाजोगाईलातूर मार्गावर रेणापूरजवळ झालेल्या भीषण अपघातात तहसीलदार गिड्डे यांचा मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा अपघात म्हणून नोंदविण्यात आले असले तरी या घटनेमागे काही संशयास्पद बाबी असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून पुढे आली होती.

नॅशनल ह्युमन राइट्स अँड क्राइम कंट्रोल ऑर्गनायझेशन व वुमन अँड चाइल्ड सेक्युरिटी

पान 3 वर

# गोवंशाला ‘राष्ट्रमाता’ दर्जा द्या; केंद्रीय गोसेवा मंत्रालयाची मागणीमाहूरमधील गोभक्तांचे राष्ट्रपतींना निवेदन



भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या भारतीय गोवंशाला घटनात्मक संरक्षण मिळावे, या मागणीसाठी माहूर येथील गोभक्त, संत समाज आणि नागरिकांनी पुढाकार घेतला आहे. ‘गो सन्मान आह्वान अभियान’ अंतर्गत राष्ट्रपतींना निवेदन पाठवून गोवंशाला ‘राष्ट्रमाता’ किंवा ‘राष्ट्र आराध्या’ असा दर्जा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रपतींच्या अलीकडील वृंदावन दौऱ्यातील ‘गोपूजन’ आणि गोवंशाला ‘जीवनधन’ असे संबोधन यामुळे गोभक्तांमध्ये आशावाद निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सध्या रस्त्यावर भटकणारा गोवंश, तसेच वाढती तस्करी ही गंभीर समस्या बनली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या

पान 3 वर

# अनोळखी इसमाचा मृत्यू; ओळख पटवण्याचे पोलिसांचे आवाहन



बीड दि.28 (प्रतिनिधी) : बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोलापूर-धुळे महामार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना 28 एप्रिल 2026 रोजी घडली असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी नागरिकांना आवाहन

बीड ग्रामीण पोलीसांनी केले आहे.

या बाबत, सरकारी दवाखाना, बीड येथुन एम.एल. सी क्र.5246 दि. 28-04-2026 अन्वये प्राप्त झाली की, बीड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत

पान 3 वर

# काडीवडगाव गावच्या सरपंच पदी श्रीमती - भागिरथी राऊत विजयी - विजयाचे किंगमेकर ठरले - उप - सरपंच - श्री गोविंद बादाडे



काडीवडगाव जनसेवा ग्रामविकास पॅणच्या कपबशी या चिन्हाच्या उमेदवार श्रीमती भागिरथी आतम राऊत या विजयी झाल्या या गावामध्ये दोन पॅनच्या माध्यामातून थेट सरपंच पदासाठी श्रीमती भागिरथी राऊत

काडीवडगाव ( बाबुराव तिडके ) वडवणी तालुक्यातील काडीवडगाव या गावच्या सरपंच पदाची पोटनिवडणुक तीन वर्षात तीन वेळेस झाली कोणत्या ना कोणत्या कारणामुळे सरपंचावर अविश्वास ठराव पारीत होत होता त्याच अनुषंगाने दि 28 एप्रिल रोजी मतदान होऊन त्याचा निकाल दि 29 एप्रिल रोजी लागला या काडीवडगाव गावच्या सरपंच पदी 125 मतानी व श्रीमती शामल हातागळे या निवडणुक लढवित होत्या या गावामध्ये एकुन मतदान 1260 आहे त्या पैकी 974 मतदान झाले श्रीमती भागिरथी राऊत

पान 3 वर

# अ ब क डं वर्गीकरणाच्या मागणीसाठी माजलगाव मध्ये व्यापक बैठक संपन्न

- भास्कर ( नाना ) शिंदे यांच्या लहुजी विद्रोही सेनेच्या वतीने बैठकीचे आयोजन.




माजलगाव / प्रतिनिधी अनुसूचित जाती मधील आरक्षणाचे अ ब क ड उपवर्गीकरण झाले पाहिजे यासाठी शहरातील व्यंकटेश हॉल या ठिकाणी दलित समाजाच्या कार्यकर्त्यांची व्यापक बैठक पार पडली.

महाराष्ट्रामध्ये तमाम दलित बांधव आरक्षणाच्या मागणीसाठी विविध संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणामध्ये आरक्षणाचे उपवर्गीकरण व्हावे यासाठी अनेक आंदोलने करत आहेत आज त्याचाच भाग बीड जिल्ह्यातील माजलगाव या ठिकाणी अशीच एक व्यापक मोठी बैठक पार पडली यावेळी लहुजी

पान 3 वर

# माजलगाव बसस्थानकात नितीन जुजगर यांच्या वतीने पाणपोई सुरू

## उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये प्रवाशांना मिळणार थंड पाण्याचा आधार




माजलगाव (प्रतिनिधी): वाढत्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन माजलगाव येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन सोपानअप्पा जुजगर माजलगावकर यांच्या वतीने बसस्थानक परिसरात प्रवाशांसाठी पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे. या स्तुत्य उपक्रमाचे उद्घाटन जोशी साहेब (ATS) व अमोल डाके यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.

उन्हाळ्याच्या कडाक्यात प्रवासी, वाटसरूंची तहान भागवण्यासाठी ही पाणपोई सुरु करण्यात आली असून, ती सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा ठरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत

पान 3 वर

# परळी वैजनाथ तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील शिपाई श्रीमती सिमिंता फड यांचा आज सेवापूर्ती निमित्त निरोप समारंभ




परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ येथे कार्यरत असलेल्या शिपाई श्रीमती सिमिंता हरीश्चंद्र फड यांचा नियत वयोमानानुसार गुरुवार, दिनांक 30 एप्रिल 2026 रोजी सेवापूर्ती निमित्त निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या समारंभास तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे उपस्थित राहणार असून कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने हा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

श्रीमती सिमिंता फड यांनी शिपाई या पदावर तब्बल 18 वर्षे प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवा बजावली आहे. त्यांनी परळी वैजनाथ येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयासह वडवणी

पान 3 वर

# वाढत्या उन्हात लहान मुलांची काळजी घ्या; बालरोगतज्ज्ञ डॉ. संभाजी नावडकर यांचे आवाहन



माजलगाव प्रतिनिधी : राज्यात सध्या तापमानाचा पारा झपाट्याने वाढत असून, कडाक्याच्या उन्हाचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ **डॉ. संभाजी नावडकर** यांनी पालकांना सतर्क राहण्याचे आणि लहान मुलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

वाढत्या उन्हामुळे लहान मुलांमध्ये डिहायड्रेशन (पाणी कमी होणे), उष्माघात, ताप आणि उलट्या यांसारखे त्रास उद्भवू शकतात. हे धोके टाळण्यासाठी डॉ. नावडकर यांनी खालील महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष देण्यास सांगितले आहे.*डॉ. नावडकर यांनी दिलेल्या महत्त्वाच्या टिप्स.मुलांना दिवसभरात भरपूर पाणी प्यायला द्या. लिंबू सरबत, ताक, नारळ पाणी यांसारख्या नैसर्गिक पेयांचा आहारात समावेश करा.सकाळी 11 ते संध्याकाळी 5 या वेळेत मुलांना कडक उन्हात बाहेर पाठवू नका. अत्यंत गरजेचे असल्यास छत्री

पान 3 वर